प्रकरण ४ थे

'आयदान' या आत्मकथनातील वाङ्.मयीन विशेष

प्रस्तावना

१) निवेदन पध्दती व भाषा

२) कोकणी ग्रामीण बोलीचा वापर

३) कोकणी स्त्रीगीतांचा वापर

४) प्रमाण भाषेचा वापर

५) 'आयदानची' प्रादेशिकता

६) वाक्प्रचार व म्हणींचा वापर

७) 'आयदान' मध्ये येणारी व्यक्तिचित्रणे

८) सारांश

९) निष्कर्ष

संदर्भ ग्रंथसूची

प्रस्तावना -

भारतीय समाज व्यवस्थेच्या उतरंडीत ज्या घटकांना अगदी तळातल्या मडक्याचे स्थान दिले आहे व 'अस्पृश्य' म्हणुन दूर लोटले गेले. त्यापैकी 'महार' हा एक समाजगट आहे. हा समाजगट अस्पृश्य मानलेल्या समाज गटात संख्येने अधिक असून महाराष्ट्रात तो सर्वत्र आढळतो. या समाज गटाची वस्ती नसलेले गाव अपवादानेच आढळते. 'गाव तिथे महारावाडा' या म्हणीत ही याचा प्रत्यय येतो. 'गाव तिथे महारवाडा' या म्हणीत या समाज गटाच्या गावगन्ना असलेल्या अस्तित्वाची साक्ष पटते. 'महार' या संपन्न समाजाची आर्थिकीकरणाच्या प्रक्रियेत वाताहत झाली. तिचा तो जुना ऐश्वर्य संपन्न इतिहास पुसला गेला. व वाताहत झालेला इतिहास हाच भूतकाळ बनला.या भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर आपले वर्तमान न्याहाळण्याचा प्रयत्न त्यांनी दलित लेखकांनी दलित आत्मकथनात केला. या आत्मकथनात अपमानित जीवन जगणारा, लाचार जाति-पोट जातीत विभागलेला वेठबिगार, हरकाम्या, फरास महार, बलुतेदार, पध्दतीतील पडल्या कामाचा चाकर, राबता महार, मुलकी, फौजदार आणि गावकीची कामे करणारा महार समाज आविष्कृत झाला आहे. काळाच्याओघात तो वेगवेगळे व्यवसायही करू लागला आहे. बौध्द धर्म स्वीकारल्यामुळे त्यांचे सांस्कृतिक जीवनही बदलून गेले आहे. या सर्व पारंपरिक आणि बदलत्या जीवनाचे चित्र महार समाजातील लेखकांच्या आत्मकथनातुन उमटले आहे. हे या आत्मकथनातील चित्रणावरुन स्पष्ट होते.

कोकणी या भाषिक रुपाची अभिव्यक्ती या आत्मकथनात झाली आहे. ही अभिव्यक्ती उर्मिला पवार या व्यक्तीची असण्यापेक्षा त्या ज्या समाजातून आल्या व ज्या परिसरातून आल्या त्यांचीच अधिक आहे. तेव्हा सामाजिक आशयाने परिपूर्ण

असे हे आत्मकथन आहे. असे या आत्मकथनाबाबत म्हणता येत नसले तरी त्या आशयाला अधिकाधिक अभिव्यक्त करणारे हे आत्मकथन व तशीच या आत्मकथनातील भाषा आहे. यात मात्र शंका नाही.

१. निवेदन पध्दती व भाषा

रत्नागिरी जिल्हा हा कोकण प्रदेशातील जिल्हा त्यामुळे कोकणी प्रदेशातील गुणवैशिष्टये साहजिकपणे 'आयदान' ला चिकटलेली आहेत. इथलं वागणं, बोलण, खाणं, पिणं हे सार लेखिकेने आपल्या लेखन कौशल्याच्या आधाराने इथे मांडलले आहे. इथला प्रदेश कसा आहे. हे सांगताना लेखिकेने प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर करत ते ते प्रदेश वर्णन योग्य साधले आहे. लेखिकेचे गाव 'फणसवळे' या गावाचा इतिहास सांगतानाच इथल्या बायका त्यांच्या पुर्वजाला कशा व का शिव्या देतात याच स्पष्टीकरण दिलं आहे. ते असं की इतक्या लांब रहदारीपासून अडवळणी असणाऱ्या गावामुळे इथल्या लोकांचे कसे हाल होतात. याच वर्णन येत. कोकणी प्रदेश असल्यामुळे इथ असणारी किर्र झाडी त्यामुळे इकडे-तिकडे वावरणारी हिंस्त्र जनावारे यामुळे माणसाची उडणारी धांदल वाघ -सिंहाच्या डरकाळीच्या भितीने उडणारे थरकाप या सगळ्याच वर्णन लेखिका आपल्या वेगळ्या निवेदन शैलीने करते.

उर्मिला पवार यांच्या निवेदनात सहजता आहे. त्यांची अल्पाक्षरी भाषा लहान लहान वाक्यातून खूप कांही सांगणारी आहे. मायदेशातील ग्रामीण भाषेतील त्यांचे निवदेन काळानुरुप वय वाढेल तसे बदलत गेले आहे. पुढे पुढे ते नागरी झालेले आहे. कोकण प्रदेशातील ग्रामीण महारी भाषेतील संवाद लक्षणीय व नाट्यपूर्ण आहेत. छोट्या - छोट्या प्रसंगाची मांडणी त्यांचा जीवनपट सहज उलघडतो. ही शैली वाचकाला खिळवून ठेवते. ग्रामीण दलितांच्या बोलीचा प्रभावी वापर

लेखिका उर्मिला पवार यांनी केला आहे. दलितांच्या जीवनातील नित्याच्याच प्रसंगातून त्यांच्या जीवनातील अपार दारिद्रय आणि करुणामय जिणे त्या सहजपणे मांडतात. त्यामुळे कारुण्य मिस्कीलपणा, उपहास आणि भाष्य यांचे बेमालुम मिश्रण त्यांच्या निवेदनात आढळते. या आत्मकथनाच्या भाषेत माधुर्य आणि लालित्य ही आहे. त्यांच्या लेखनात त्यांच्या समाजाविषयीचे अनेक बारीक सारीक तपशिल येतात.

२. कोकणी ग्रामीण बोलीचा वापर

लेखिकेचे मुळ गाव फणसवळे हे रत्नागिरी जिल्ह्यातील एक खेडे आहे. त्यामुळे संपूर्ण पुस्तकभर कोकणी बोलीचा प्रभाव जाणवतो. त्याच प्रदेशातील बोली निवेदनासाठी वापरल्यामुळे घटना प्रसंग उठावदार होण्यासाठी त्याचा चांगल्या पध्दतीने वापर झालेला आहे. वेगवेगळे वाक्प्रचार व म्हणी कोकणी बोलीतलेच वापरले गेले आहेत.

''आयदान'' मध्ये ग्राम्य शंब्दांचा भरणा पुष्कळच असलेला दिसतो. रांडचा, रंडकीसुज, मेल्या, आय झवाऱ्या, गांड फाटणे, रांड काय कुणास झ्यटान शिपत्याय असे ग्राम्य शब्दप्रयोग ठिकठिकाणी आढळतात. 'रांड झाली यसवा तं काय करी पेसवा ?,' 'अचार खाणं नि मसणात जाणं', बायकाच्या कंबरा ताठ तर संसार ताठ' अशा काही कोकणी लोक जीवनातील म्हणींचा वापर लेखिका योग्य प्रकारे करते. 'शेण' या नामधातुपासून 'शेणते ' हे क्रियापद मोठे वेधके आहे. कोकणी बोलीतील नेमके संवाद योजून लेखिकेने निवेदन ओघवत केले आहे. 'अगो तु थय जावनुका .... तुका ता बरा दिसणार नाय'. अशा संवादातून कोकणी बोलीची लकब प्रत्ययास येते. कोकणी बोलीत वापरला जाणार 'ळ' ऐवजी 'ल' हा वर्ण अनेक

शब्दात दिसून येतो. देवशाली, गाडीतल पलाला, जल्लं इ. मधून हा 'ल' प्रकार दिसतो.''(१)

अशा पध्दतीने कोकणी प्रदेशातील विविध दृश्ये आपल्या वेगळ्या निवेदन शैलीने लेखिकेने अतिशय जीवंत व चित्रमय पध्दतीने मांडली आहेत. योग्य प्रसंगासाठी योग्य भाषा हा या आत्मकथनाचा एक विशेष आहे. निवेदनातील लकबी प्रसंगाच्या जिवंतपणासाठी वापरलेल्या प्रतिमा व प्रतिके यांचे सुंदर मिलन त्यामुळे दलित समाजाची व दलित स्त्रीची वास्तव परिस्थिती समजण्यासाठी 'आयदान' फार परिणामकारक ठरते. आता पर्यंतच्या सर्वच आत्मकथनांनी दलित स्त्रियांची दु:खे जरी मांडली तरी ती सर्व पुरुष व्यवस्थेभोवती फिरतांना आपल्याला दिसून येतात. परंतु आयदान हे आत्मकथन पुरुषी व्यवस्थेच्या बेड्या तोडण्याचे प्रयत्न करुन त्याच्यात पुर्णपणे यशस्वी झालेले आपल्याला दिसून येते.

३. कोकणी स्त्री गीतांचा वापर

आयदानचे वाङ्.मयीन सौंदर्य वाढविले आहे ते म्हणजे येथे भेटणाऱ्या स्त्री गीतांनी. या गीतांच्यामधून लेखिकेने व्यक्त केलेल्या स्त्री मनाच्या व्यथा, वेदना वाचकाच्या ऱ्हदयाशी जाऊन भिडतात. लेखिका लहान असताना त्यांच्या घराच्या भोवतालच्या बायका जे गीत गायच्या ते लेखिकेने येथे दिले आहे.

'' डाली का सालीचं गिरजान् घलतं कांडान.
एक पाय घालते गिरजा उठते बसते........
....
..... गौरीच्या सनाला यावं माला न्हेयाला
....
एवढ्याच काय बंदवा मी कसा रं काढावा
चल भैनी चल भैनी मी आला तुला न्हेयाला.''(२)

स्त्रिचा सासरी चालणारा छळ ती आपल्या या गीतांतून सांगते. तसेच लग्न कार्याच्या वेळी वेगवेगळे विधी हिंदू धर्मात केले जातात. हे विधी करत असताना बायका स्त्रीगीते गातात. ही स्त्रीगीते म्हणजे मराठी लोकसाहित्यातील अनमोल खजिनाच आहेत. उदा.-

" पुसचा पुसवरा.......... मायेचा निवारा

सुकला पातेरा............. किस्नाच्या हलदीचा"

१९५६ च्या धर्मांतरानंतर सर्वच महारांनी हिंदू धर्मातील चालीरीतीला तिलांजली दिली. व डॉ. आंबेडकरांच्या वरील स्तुतीपर गीते या स्त्रीया गावू लागल्या.

" उजाडली पौर्णिमेची रात......

गोरगरीबांच्या मंदीरात..........

बाबांची आठवण ऱ्हदयात ....

कशी ऱ्हाऊ सुखी संसारात.........." (३)

अशा पध्दतीची स्त्री गीतं या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतात. या गीतांना तिथल्या बोलींचा प्रोदशिक वैशिष्टयांचा संदर्भ जोडून ही गाणी गायिल्यामुळे वाङ्मयीनदृष्टया उत्कृष्ट असणाऱ्या या गीतांना मराठी साहित्यातील लोकसाहित्या-च्या अभ्यासकांना एक वेगळीच संधी मिळालेली आहे.

४. प्रमाण भाषेचा वापर

एकूणच संपूर्ण 'आयदान' मध्ये लेखिका उर्मिला पवार यांनी प्रथम पुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केलेला आहे. सुरवातीला कांही घटना प्रसंग सांगत असताना मराठी कोकणी भाषेचा जरी वापर केलेला असला तरी संपूर्ण पुस्तकभर प्रमाण भाषेचा वापर केलेला आहे. विशिष्ट संवाद कोकणातील व त्या घटना प्रसंगाची

पार्श्वभूमी सांगण्यासाठी लेखिकेने प्रमाण भाषेचा वापर केलेला आहे. प्रमाण मराठी भाषेवर जसा इंग्रजी व हिंदी आदी भाषांचा प्रभाव आहे तसा ते लेखिकेने वापरला आहे. त्यामुळे यातील भाषा समजण्यासाठी कोणत्याही पध्दतीच्या अडचणी निर्माण होत नाहीत. दलित स्त्री-मुक्ती संघटनेचे काम करत असताना लेखिकेला अनेक चांगले वाईट जे अनुभव आले ते सांगण्यासाठी लेखिका प्रमाण भाषेचा वापर करताना दिसते प्रसंगाचे वास्तव चित्रण करण्यासाठी लेखिकेने प्रमाण भाषेतल्या म्हणी व वाक्प्रचार वापरलेले आहेत. त्यामुळे आयदानचे वाङ्.मयीन सौंदर्य वाढवण्यासाठी मदत झाली आहे. मनुप्रणीत समाजव्यवस्था संपूर्ण स्त्री जातीला जी दयनीय अवस्था भोगावी लागते त्याचं संपूर्ण वास्तव दर्शन करण्यासाठी लेखिका प्रमाणभाषेचा वापर करते.

रत्नागिरीच्या परिसरात राहत असताना लेखिकाच्या अवतीभोवती अनेक श्रध्दा- अंधश्रध्देचे बळी गेलेले लोक भेटले. परंतु मुंबईसारख्या शहरात वावरत असताना ही लेखिकेला जुन्या व खोडसाळ समजुतींना बळी पडलेली माणसे वारंवार भेटतात. त्यांच्या स्वभावाचे चित्रण करण्यासाठी लेखिका परिणामकारकपणे प्रमाण भाषेचा वापर करते.

धर्मांतरानंतर नवबौध्दांच्यात अनेक समस्या उभारल्या त्यांच्यात झालेल्या या मूलभूत परिवर्तनाच वर्णन करण्यासाठी लेखिका प्रमाण मराठी भाषा तसेच प्रमाण मराठी भाषेत लिहिलेल्या भीमगीतांच्या व बुध्दगीतांचा वापर करताना आपल्याला आढळून येतात. ब्राम्हणी संस्कृतिपेक्षा बहुजनांची संस्कृती ही कसी सर्वश्रेष्ट आहे हे प्रमाण मराठीतच सांगितले आहे.

५. आयदानाची प्रादेशिकता

आयदान या आत्मकथनाला कोकणी प्रदेशाची प्रादेशिकता चिकटल्यामुळे या आत्मकथनाचे वाङ्.मयीन सौंदर्य आणखी वाढले आहे. लेखिका आपल्या बोलीचा व इथ निसर्गान दिलेल वरदान या सर्वांचा वापर करत. आयदान मध्ये अनेक घटना प्रसंग जिवंत उभे आहेत." डोंगराच्या कडेकपारितल्या कुठल्यातरी घबदाडीत, इतर गावांवरून ओवाळुन टाकल्या सारख्या फणसवळे गावात तो (पुर्वज) येऊन राहिला हे या गावातून बाजाराला जाण्याच्या मार्गात आडवे येणारे हे दोन उभे डोंगर,दगड - गोट्यांनी भरलेल्या, खडबडीत, वेड्यावाकड्या, चढताना प्राण कंठाशी आणणाऱ्या त्यांच्या घाट्या, जरा डोळा चुकला तर तोल जाऊन कुठेतरी नाहीसं करतील अशा निसरडया वाटा, नित्या घसरत्या उताराशी लहानमोठी कोंडी पोटात घेऊन जंगल - दऱ्यात वळत जाणाऱ्या दोन नद्या- हे सारं पार केल्यावर पुन्हा शहराकडे जाणारा धुळीनं - मातीनं भरलेला लांबच लांब रस्ता प्रत्येक ठेचेगणिक पुर्वजांची आठवण द्यायचा." [४] अशा पध्दतीच्या वर्णनान लेखिकेने आपला गाव व माणसे कसी वसलेली आहेत कसी जगत आहेत. याच वर्णन अतिशय नेमक्या वसमर्पक शब्दात केलेल आहे.

" उगवतीला असलेल्या डोंगराच्या पायाजवळ नदी वाहते. त्या नदीच्या ऐलतीरावर दोन डोंगरांच्या बेचक्यात आमची वाडी वसलेली आमच घर अगदी नदी च्या काठाला लागुन की, तव्यावर भाकरी टाकवी नि नदीवर जाऊन घागर भरून आणुन भाकरी परतावी अस आये म्हणायची आमची घर उगवतीला तर काहींची मावळतीलात्यामुळे 'उगवत', 'मावळत' असे शब्द वापरत असत. आमच्या घरांकडे येण्याचा मार्ग मावळतीतुन होता. मावळतीच्या बायकातिकडे वळायच्या. आम्ही पुढे

यायचो. वाडवडीलांच्या समाध्या उजवीकडे असायच्च्या तिकडे जाऊन आम्ही समाधी वरडोकं टेकायचो नि वळायचो.'' (५) अशा पध्दतीन लेखिकेन कोकणी प्रदेशाचा योग्य पध्दतीन वापर केलेला आपल्याला दिसून येतो.

६. वाक्प्रचार व म्हणींचा वापर

लेखिका उर्मिला पवार यांनी आपल्या आयदान या आत्मकथनात प्रत्येक घटना प्रसंग उठावदार होण्यासाठी त्या घटना प्रसंगाला साजेसे असे कोकणी भाषेतील वाक्प्रचार व म्हणी वापरुन आयदानचे वाड्.मयीन सौंदर्य वाढविले आहे. यातून वेगवेगळी भाषिक व प्रादेशिक वैशिष्टये दिसतात. म्हणी व वाक्प्रचार वाचत असताना वाचकांना त्या त्या घटना प्रसंगाचा वास्तव अनुभव येताना दिसतो. त्या म्हणी व कांही सूचक असे शब्दही लेखिकेने वापरले आहेत. स्त्रियांच्या बोलीतले सांकेतिक शब्द हे ही या आत्मकथनाचे एक वैशिष्टय असल्यामुळे साहजिकपणे स्त्री बोलीतले सूचक शब्द लेखिका प्रसंगाच्या परिणामकारकतेसाठी वापरते. 'रांड काय कुनासझ्याटान् तरी शिपत्याय.....?'' रांडचा काय गडदा तरी हालतॉय ?,' 'आमंचा मेला जलमच खोटा,' 'ग तुजं कालीस कावल्यान पलवलान् बग..' 'मसणगिरी बुवा,' 'फटी आक्का' बाटग्यांची शाळा', 'जातीसाठी मातीखावी' 'सिनल', 'आंबेडकर-खाडी' 'पोरींच्या जातील शिकुन काय कन्याचं हाय, चुलच ना फुकयाची हाय,' 'तव्याची घस', 'घास मोज्याचं घर,' 'नाही, ते महार जेवतायत...', 'शेणातला किडा शेणातच राहत नाही' ' भुत विशेषत: स्त्रियांना धरायची', 'गोंदुन आलीस का चोंदुन आलीस ?' 'मुलगी दिल्या घरी मेली' 'घरीण', 'सुकती लागली,' 'बोचन', 'तेरेसा शिमगा,' 'हावरे', 'सयमाची होळी,' रांड झाली यसवा तं काय पेसवा?' कुंडामांडा खाय त्याचा दांडा उभा ऱ्हाय, उघड्या शेजारी नागडा गेला नि दोघे थंडीत कुडकुड्न

मेले, 'बायंगी भुत' 'कावळा शिवणं, मरू दे फणशीत जाऊ दे, रंडकी सुज, चुलीमाग बानोसा, चुलीमाग खानं नि मांडीचं वसनं, काय बाय हये अचाट खानं नि मसनांत जानं.... 'सन गेला सरुन नि आंदल्याला आलं भरुन' 'जेवरे जावया सासुच्या शेवया,'प्रत्येक नवरा बायकोवर राग काढताना तिच्या माहेरचा उध्दार करतो, 'लगीन इला लागॉक नि व्हकलेस झाला हगॉक ' 'न्हेवरा म्हणाला रांड त जग म्हणतं सॉड, माणसांची रग जिरवायला असा काहीतरी उपाय असायला हवा असं वाटायचं,पावसान झोडलनि पतीनं मारलं तर सांगायच कुणाला ?, ए. पी., डी. पी., कोब्रा. उडदामाजी काळे-गोर, 'तुझं माझं सरलं - घेतुझ डोरलं, ' आई होन म्हंजे सती जानं बाय, सती !!!, 'कपाळाच्या टिळ्यापेक्षा पोटच्या गोळ्याचं दु:ख खुप मोठ असतं हो..,' मनाच्या कडेलोटानंतर ही घरात हसत खेळत वावरण्याचं बाळकडु, समाजानं बाईच्या घशात घुसमटेपर्यंत ओतलेले असत. ग्रामीण आणि दलित समाजात वाक्प्रचार ही बोलीभाषेत सहज मिसळून गेलेले असतात. ते बोलण्यातून व्यक्त होतात, 'आयदान'मधून ही वाक्प्रचार अर्थपूर्णत्वाने प्रकट झाले आहेत.

" ' आयदान ' मधील अनुभव विश्व प्रकट करणारी लेखिकेची भाषाशैली रसरशीत, अत्यंत ओघवती व प्रभावी आहे. प्रमाण मराठीतील निवेदन बोलीतील संवाद, शिव्या, म्हणी व वाक्प्रचार , प्रत्ययकारी वर्णन, धारदार भाष्ये या सर्वांनी ती संपन्न आहे. 'कुडामांडा खाय त्याचा दांडा उभा -हाय, बाईच जिनं म्हंजे खंडीभर खानं नि मांडीच बसन, धटाय खाय मिटाय नि गरीब खाय गचयाली (गंचाडी), अचारखानं नि मसणात जानं ' ही म्हणींची काही उदाहरणं सासरच्या गावचे शब्दरुपरंगीत चित्रण लेखिकेने उभे गेले आहे. " दुरवर सह्याद्रीचा निळा डोंगर, त्याच्यापायथ्याशी हिरव्यागार झाडांच्या कुशीत लपलेली शेंदरी कौलांची घरं......

आमच्या सोबत चालल्या सारखे. मोकळे चौकोनी शेतमळे......... त्यामधुन वळत जाणारी पिवळी पाऊल वाट...... पुढे चार वाटा एकत्र आलेला चव्हाटा, तिथं सागाच उंचचउंच झाडं त्यांना लागटून डोंगरात पळालेली पाऊल वाट.... तिच्यातला एक दोरनिसटून विहीरीकडे वळलेला..... आणि दुसरा तसाच लहरत नदीच्या दिशेने गेलेला त्याच बाजुला शाळा बस्ताडकर खिश्चनांची गिरण खोताची वाडी.'' (६)

उर्मिला पवार यांची भाषा साधी स्वच्छ व प्रवाही आहे. त्यांच्या प्रतिमा त्यांच्या अनुभवाशी तद्रुप होणाऱ्या आहेत. या भाषा शैलीमुळे कोकण परिसरातील वास्तव चित्रण वाचकां समोर उभे राहते.

७. ' आयदान ' मध्ये येणारी व्यक्तिचित्रणे

'आयदान' मध्ये येणारी व्यक्तीचित्रे पाहत असताना महत्वाच व्यक्तिचित्रण आहे ते लेखिकेच्या आईचे, लेखिकेची आई सुप, रोवळ्या, टोपल्या वळण्याचा व्यवसाय करायची त्या आयदान ची विन लेखिका आपल्या आयदान या आत्म-कथनांशी जुळवू पाहते. त्यामुळे लेखिका तिच्या आईचे दु:ख त्यातून सांगत नाही. तर एकूण संपूर्ण कोकण परिसरातील दलित स्त्रीयांच दु:ख सांगताना दिसते. तसेच या आत्मकथनात भेटणाऱ्या भिकी, प्रमिला, शांतिआक्का इ. स्त्रीया या आपल्या स्त्रिपणान जीवनात इथल्या व्यवस्थेन जी गुलामी दिली आहे. त्या गुलामगिरीत जगताना दिसतात. तसेच इथल्या स्त्रीयांही स्त्रीयांची पिळवणुक करताना दिसतात. कारण इथली समाजव्यवस्था मनुस्मृतीतील लेखनाप्रमाणे चालणारी व वागणारी आहे. त्यामुळे ती स्त्री स्वातंत्र्य नाकारते. व स्त्रीला गुलामीचे जगणे जगण्यासाठी भाग पाडते.

मनुप्रणित व्यवस्थेने शिकवल्याप्रमाणे इथला सर्वच जातीचा पुरुष स्त्री ही

आपली जन्मोजन्माची गुलाम आहे व तीला जनावराप्रमाणे वागवले तरी चालते. या मताचा आहे. दलित चळवळीत कार्य करणारे पुरुषही दलित मुक्तीसाठी झटतात. पण स्त्री मुक्तीबद्दल कांही बोलत नाही. याच वर्णन म्हणून लेखिका आयदानमध्ये पती हरिश्चंद्र याचे उदाहरण देते. हा चळवळीत काम करणारा पुरुष असून ही स्त्री स्वातंत्र्याविषयी इतका सक्रिय कार्य करताना दिसत नाही. तसेच लेखिकेचे बाबा मुलींनी शिकाव यासाठी हट्ट धरणारे परंतु 'मुलगी दिल्या घरी मेली ' या मानसिकतेचे असलेले आढळून येतात. तसेच शांताराम सारखे पुरुष स्त्रीचा कांही गुन्हा नसताना तिला खूप मारतात. अशापध्दतीने स्त्रीयांचे शोषण करणारे पुरुष दिसतात. तर लेखिकेसारखी अपवाद सोडून सर्व स्त्रीया या व्यवस्थेने शोषलेल्या आपल्याला दिसून येतात.

लेखिका उर्मिला पवार यांनी आयदान या आपल्या आत्मकथनाला स्वत:ची अशी वेगळी निवेदन पध्दती व भाषा वापरल्यामुळे त्याचा वेगळा ठसा मराठी साहित्यात उमटला आहे. त्याचबरोबर त्या ज्या कोकणातील ग्रामीण परिसरात राहत होत्या, तिथल्या बोलीचा संवादासाठी वापर केल्यामुळे ते ते प्रसंग अधिक जीवंत झाले आहेत. तसेच लेखीका एक स्त्री असल्यामुळे स्त्रीगीतांतून स्त्रिया आपल दु:ख कस मांडतात याच ही चित्रण योग्य साधल आहे. तसेच निवेदनात लेखीका काही ठिकाणी प्रमाण भाषेचा अतिशय नेमकेपणाने वापर करते. सुशिक्षितांना समजवून सांगण्यासाठी लेखीकेने याचा वापर केला आहे तर आपल्या दु:खाची वीण नेमकी सांगण्यासाठी तसेच प्रसंगांचे वर्णन नेमके साधण्यासाठी ती कोकणी भाषेतील वाक्प्रचार आणि म्हणी यांचा योग्य वापर केला आहे. तसेच येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती आपल्या व्यक्ती विशेषांनी लेखीकेच्या आयुष्यात येतात त्यामुळे त्या मनात घर करुन राहतात. या सांगण्याचा योग्य वापर लेखीकेला साधल्यामुळेच वाड्.मयीन मुल्यमापनात हे आत्मकथन इतर आत्मकथांच्या पुढे सरसी घेताना आपल्याला दिसते. अशा पध्दतीने 'आयदान' हे आत्मकथन इतर दलित स्त्रियांच्या आत्मकथना-पेक्षा आपली एक वेगळी ओळख मराठी साहित्यात दाखविते. म्हणून वाड्.मयीन मूल्यमापनात इतर आत्मकथनांच्यापेक्षा त्याच स्थान काहीस वरच आणि दर्जेदार ठरत.

८. सारांश

कोकणातील महार या समाजाची विशिष्ट भाषिक अभिव्यक्ती आयदानमध्ये पहायला मिळते. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक गती प्रगतीचा आलेख आयदान मध्ये प्रामुख्याने आपल्याला जाणवतो. कोकणी भौगोलिक प्रदेशाची गुणवैशिष्टे 'आयदान' ला चिकटली आहेत. कोकणी लोकांचे वागणे, बोलणे, खाणे, पिणे हे सगळे सांगताना लेखिकेने कलात्मक निवेदन शैलीचा वापर केलेला आहे. लेखिका ज्या जीवनाच्या क्षेत्रातील अनुभव प्रकट करीत असते. त्या क्षेत्रातील स्तरातील भाषा किंवा बोली लेखिकेच्या लेखनातून अवतरताना दिसते.

आयदानच्या निवेदन शैलीवर लेखिका उर्मिला पवार यांच्या स्वभाव वृत्तीचा परिणाम जाणवतो. कोकणी परिसरात स्त्रीयांच्या तोडी जी ग्रामीण बोलीभाषा बोलली जाते तिचा वापर लेखिकेने पुस्तकातील संवादासाठी वापरली आहे त्यामुळे उठावदार झाली आहे. स्त्रीगीते ही मराठी लोकसाहित्याने मराठी साहित्याला दिलेले एक मोलाचे योगदान आहे. या स्त्रीगीतांचा वापर ही लेखिकेने योग्य ठिकाणी करुन स्त्रीगीतांतून स्त्री दुःख कस मांडल जात, हे सांगितल आहे. मनुप्रणीत समाज व्यवस्थेने इथल्या दलितांना पिळले आहे. भरडले आहे. त्यामुळे त्यांच्यातून अनेक बळी गेलेत. अस्पृश्यतेचे बळी, भुकेचे बळी, अंधश्रध्देचे बळी गेलेत अशा सामाजिक प्रश्नांची चर्चा आयदान मध्ये येते. स्त्री ही दलितांहून दलित व गुलामाहून गुलाम आहे. त्यामुळे त्यांच शोषण होत आहे. त्यांची पिळवणुक होते आहे. ती कस कशी होते अशा प्रश्नांची चर्चा आयदान मध्ये केली गेली आहे. आयदान या दलित स्त्री आत्मकथनात येणारी सर्वच पात्रे दलितपणाची जाणीव व्यक्त करणारी आहेत. इथे स्त्रीया ज्या भेटतात त्या व्यवस्थेखाली चिरल्या गेल्या आहेत. तर चातुवर्ण्य व्यवस्थेत चिरडले गेलेले पुरुष ही स्त्रीयांच शोषण करतात. हे लेखिकेने दाखवून दिले आहे.

९. निष्कर्ष

१) उर्मिला पवार यांच्या निवेदनात सहजता आहे. त्यांची अल्पाक्षरी भाषा लहान लहान वाक्यातून खुप काही सांगणारी आहे.

२) रत्नागिरी जिल्ह्यातील फणसवळे गावाच्या आसपास बोलणाऱ्या बोलीचा लेखिकेने सुरवातीला उपयोग केला आहे. तर उत्तरार्धात प्रमाण भाषेचा वापर केला आहे.

३) स्वागितांचा वापर अतिशय परिणाम कारकपणे केलेला आहे.

४) कोकणी प्रदेशातील प्रदेशाचा अतिशय योग्य वापर करुन वातावरण उठावदार केले आहे.

५) स्त्री बोलीतले सांकेतिक शब्द, सूचक शब्द यांचा सहजपणे वापर केलेला दिसून येतो.

६) आयदान मध्ये भेटणारी प्रत्येक व्यक्ती त्याच्या स्वत:च्या वेगळ्या स्वभाव वैशिष्ट्यासह चित्रित झालेली आहे.

७) आयदान मधील अनुभव विश्व प्रकट करणारी लेखिकेची भाषाशैली रसरशीत अत्यंत ओघवती व प्रभावी आहे.

● संदर्भ ग्रंथसूची

१) डॉ. विलास थोरात - अस्मितादर्श (जा . फे. मा.) २००५ (पृष्ठ क्रं. ४१)

२) उर्मिला पवार - आयदान ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. (२००३)
(पृष्ठ क्रं. २५, २६)

३) तत्रैव (पृष्ठ क्रं. ३१)

४) तत्रैव (पृष्ठ क्रं. १)

५) तत्रैव (पृष्ठ क्रं. ३१)

६) मीना गोखले - आयदान (समीक्षा)

महाराष्ट्र फौंडेशनच्या संवादीनी (२००४) या नितकालिकातील लेख (पृष्ठ क्रं.३४)